Rizkal

ISSN 2348- 5825

International Registered &Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Indo Asian Philosopher

(UGC Approved,Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XII, Vol. - II Impact Factor 5.60 (GRIFI) Oct. 2018 To Mar. 2019



EDITOR IN CHIEF

Dr. Pramod G. Kalam

Scanned with OKEN Scanner

| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 15 | भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे योगदान<br>**डॉ. एन.पी. चिताडे, डी. डी. विडवे** | 70 |
| 16 | महिला उदयोजकांच्या समस्या व उपाययोजना<br>**अर्चना अनिल विखे** | 73 |
| 17 | भारतातील बालकामगारांच्या सामाजिक - आर्थिक समस्यांचा एक आढावा<br>**डॉ.मिनाक्षी भास्कर जाधव** | 77 |
| 18 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान<br>**डॉ. ए.एम. मोरे** | 81 |
| 19 | भारतातील नद्या जोड प्रकल्प : एक दृष्टीकोन<br>**सी. एस. शेळके** | 85 |
| 20 | भारतीय करप्रनाली आणि GST एक अभ्यास<br>**चेतना दत्तात्रय जगताप** | 90 |
| 21 | कृषी क्षेत्रात वीज क्षेत्राचे महत्व<br>**डॉ.महादेवी वैजनाथ फड** | 95 |
| 22 | उस्मानाबाद जिल्ह्यातील कुक्कुटपालन व्यवसायाचा चिकित्सक अभ्यास<br>**अमोल सिताराम शिंदे** | 98 |
| 23 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समस्या<br>**अंकुश तु.करपे** | 105 |
| 24 | आर्थिक विकासाची उंच भरारी कृषी क्षेत्रावरच<br>**डॉ. शिवाजी भ.यादव** | 114 |
| 25 | महाराष्ट्रातील सद्यस्थितीतील कृषीउद्योग : समस्या आणि उपाययोजना<br>**डॉ. विशाल शिवाजीराव करपे** | 119 |
| 26 | असमानता संस्थापित मानव विकास निर्देशांक<br>**जे. बी. यादव** | 126 |
| 27 | भारतीय महिला आणि स्त्री मुक्ती चळवळ<br>**दिपक सुर्यवंशी** | 132 |
| 28 | अप्रत्यक्ष कर सुधारणा : वस्तू-सेवा कर<br>**डॉ. ज्ञानेश्वर जिगे** | 139 |
| 29 | महिला सबलीकरणाची वास्तविकता<br>**डॉ. संजय काशीनाथ मगर** | 143 |


Scanned with OKEN Scanner

Indo Asian Philosopher (IAP)
(77)
IMPACT FACTOR 5.60
ISSN 2348-5825
Indo Asian Philosopher (IAP)
Issue : XII, Vol. II
Oct. 2018 To Mar. 2019
www.irasg.com
Research Paper 17 Economics

# भारतातील बालकामगारांच्या सामाजिक - आर्थिक समस्यांचा एक आढावा

**डॉ.मिनाक्षी भास्कर जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे उत्पादनाच्या घटकांना अन्यसाधारण महत्त्व असते. भूमी, श्रम, भांडवल, संघटक आणि आधुनिक तंत्रज्ञान या उत्पादनाच्या घटकांपैकी श्रम हा घटक जिवंत असतो. त्यावरच उत्पादनाची प्रक्रिया अवलंबून असते. श्रमिकाला आपले श्रम विकावे लागते. कारण त्याशिवाय श्रमिकाकडे अन्य उत्पादनाची साधने उपलब्ध नसतात. श्रमामध्ये प्रौढ स्त्री-पुरूषांप्रमाणेच बालमजुरांचाही मोठ्या प्रमाणात उत्पादनवाढीसाठी उपयोग केला जातो. म्हणजेच अशा श्रमाची विविध मार्गाने पिळवणूक, शोषण केले जाते.

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडवून आली. भांडवलदारांनी आपल्या भांडवलाच्या आणि संपत्तीच्या जोरावर अनेकविध उद्योगधंदे उभारले. कारण त्यामधून त्यांना लाभाधिक्य प्राप्त करावयाचे होते. लाभाधिक्य प्राप्त करण्यासाठी पुरूष मजूर, स्त्री मजूर आणि बालश्रमिक यांच्याकडून अतिरिक्त उत्पादन करण्यासाठी रात्रंदिवस कमी वेतनावर काम करावयास भांडवलदार भाग पाडीत असत. विशेषतः स्त्री मजूरांना आणि बालश्रमिकांना अतिशय कमी वेतन देवून त्यांचे प्रचंड प्रमाणात शोषण केले जात होते. म्हणजेच सारांशाने औद्योगिक क्रांतीपासून बालश्रमिकांचा उगम झाल्याचे आढळून येते.

आज जागतिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर तसेच जिल्हा पातळीवर बालश्रमिकांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. विशेषतः विकसित देशांपेक्षा न्युनविकसित किंवा भारतासारख्या विकसनशील देशात वाढत्या लोकसंख्येमुळे बालश्रमिकांच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वृद्धी होत असल्याचे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धानंतरच बालकांच्या हक्काबद्दल जगामध्ये जागरूकता निर्माण झाली. त्यासंबंधी ठराव करताना बालश्रमिकांचा प्रश्नही संयुक्त राष्ट्र संघासमोर उभा राहिला. शेवटी बालश्रमिकांचा उगम हा पैशाच्या बेकारीतच होत असतो.

बालश्रमिकांची समस्या ही एक जागतिक व ज्वलंत बनली आहे. या समस्येची व्याप्ती व स्वरूप आज विस्तारत आहे. समाजाला भेडसावणारा एक गंभीर प्रश्न बनला आहे. तो सुसंस्कृत समाजाला एक प्रकारचा कलंकच ठरला आहे. आज भारतासारखी अनेक राष्ट्रे या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु न्यून



Scanned with OKEN Scanner

विकसित किंवा विकसनशील देशात लोकसंख्या वाढीस जोपर्यंत प्रभावी लगाम घातला जात नाही. तोपर्यंत बालश्रमिकांची संख्या कमी होणार नाही.

**बालश्रमिक कोणास म्हणावे:**

1. आंध्रप्रदेशातील हैद्राबाद येथील श्री.एम.व्ही. फाऊंडेशन यांनी"शाळेबाहेरील मुलं हे बालश्रमिक अशी बालश्रमिकांची व्याख्या केली आहे."
2. भारत सरकारने संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे मान्य झालेल्या मसुद्यावर स्वाक्षरी करून बालहक्क संवर्धन व विकास यासाठी आपली वचनबद्धता मान्य केलेली आहे. त्यामध्ये बालश्रमिक कोणास म्हणावे याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. "बाल म्हणजे 14 वर्षे वयाखालील कोणतेही मूल" व ज्या बालकावर अर्थाजनाची जबाबदारी असते. जी बालके शारीरिक व मानसिक विकासाला मारक अशी कामे करतात जी कुटुंबाला दुरावलेली असतात. ज्यांच्या शिक्षणावर व विकासावर विपरीत परिणाम होत असेल तर अशा कामगारास बालकामगार असे म्हणतात.

**बालकामगाराचे स्वरूप :**

बालकामगाराच्या कामाचे स्वरूप जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर बदलू लागले आहे. आज बालश्रमिकांच्या कामाच्या स्वरूपामध्ये बदल होताना दिसतो. बालकामगार आज विविध क्षेत्रात काम करताना दिसून येतात. बालकामगार हे धोकादायक व बिगरधोकादायक क्षेत्रात काम करतात त्या कामात त्यांच्या प्रकृतीला सुरक्षिततेला नैतिकतेला धोका पोहोचता. अशा उद्योग व्यवसायामध्ये त्यांना प्रतिकूल परिस्थितीमुळे काम करावे लागते.

विशेषतः हॉटेलमध्ये काम करणारी, भीक मागणारी, अंमली पदार्थाच्या व्यवसायात काम करणारी, यंत्रमाग उद्योगात काम करणारी, शेतीत काम करणारी, विडी उद्योगात काम करणारी, फटाके, काच उद्योगात काम करणारी, काडीपेट्या, दगडाच्या खाणी, स्टोन क्रेशरवर तसेच मासेमारी इत्यादी उद्योगधंद्याचा समावेश होतो

विशेषतः एकूण बालश्रमिकांपैकी 60 टक्के बालश्रमिक ग्रामीण भागात आढळतात. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कृषी प्रधान देश होय. अशा कृषी व्यवसायामध्ये यांत्रिकीकरण व प्रगत तंत्रज्ञान वापरले जाण्याचे प्रमाण कमी असते.

**बालकामगारांची व्याप्ती :**

बालकामगारांची समस्या ही एक गंभीर समस्या आहे. भारतात सुमारे 11 कोटीपेक्षा जास्त बालश्रमिक आहेत असे भारत सरकारचे श्रम मंत्रालय सुचित करते. द ऑपरेशन्स रिसर्च ग्रुप बडोदा यांच्या संशोधन निष्कर्षाप्रमाणे 1983 साली भारतातील बालश्रमिकांची संख्या 44 दशलक्ष असल्याचे म्हटले आहे. हा आकडा सदर संस्थेने 1980-81 मध्ये केलेल्या अखिल भारतीय बालमजूर संप सर्व्हेच्या निष्कर्षावर आधारित आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

1. बालकामगारांच्या सामाजिक समस्यांचा शोध घेणे.
2. बालकामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
3. बालकामगार कोणकोणत्या क्षेत्रात काम करतात त्यांचा शोध घेणे.

**बालश्रमिकांची सामाजिक-आर्थिक समस्या :**

अर्थव्यवस्थेच्या उत्क्रांतीच्या टप्प्यावर बालश्रमिक प्रथा विकसित झाली. ह्या प्रथेमुळे बालकांचे शोषण केले जाते. त्यांची शारिरीक, मानसिक वाढ खुंटते तसेच त्यांचे बालपण हिरावून घेतले जाते. त्यांना शिक्षण मिळत नाही.



Scanned with OKEN Scanner

परिणामी त्यांची कार्यक्षमता घटते व बालश्रमिकांचे नुकसान होते.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अहवालानुसार जगात 250 दशलक्ष बालश्रमिक आहेत की, ज्यांचे वय 14 वर्षापेक्षा कमी आहे. त्यातील 177 दशलक्ष बालश्रमिक हे बालश्रमिक हे विकसनशील राष्ट्रतील आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने भारत आणि पाकिस्तान या राष्ट्राचा समावेश होतो. रस्त्याच्या बाजूची हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकामाच्या ठिकाणी आणि कारखान्यात ही बालके काम करताना आढळतात.

बालकामगारांची समस्या ही निश्चितच देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाची समस्या आहे. हा प्रश्न आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी जोडला गेलेला आहे. वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकरण आणि वाढते शहरीकरण यामुळे हा प्रश्न नफा मिळविण्यासाठी उद्योगपती आणि व्यापारी हे त्यांना सहज मिळण्यासारखे असतात. ते कधीही संप करीत नाहीत. त्यामुळे त्यांना कमी मजूरी देऊन मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जाते.

बालश्रमिकांचा विकास हा फक्त आर्थिक स्थितीवरच अवलंबून असतो असे नाही. तर सामाजिक स्थितीवरही अवलंबून असतो. कोवळ्या लहान वयात मुलांना कष्टाची कामे करावी लागल्यामुळे त्यांच्या शारिरीक वाढीत अडथळे निर्माण हेतात. तसेच बालश्रमिकांच्या समस्येचा परिणाम बालकांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच कुटुंबावर आणि पर्यायाने समाजावर व देशावरही होतो. मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी क्षेत्राशी संबंधित बालश्रमिकांच्या समस्या असतात. कुपोषण, सकस आहाराची अनुउपलब्धता, अनारोग्य चुकीच्या मार्गाने होणारे सामाजिकरण, शिक्षण घेण्याच्या संधी नसणे, मनोरंजनाच्या सोईचा अभाव इत्यादीवरून बालश्रमिकांची सामाजिक स्थिती दिसून येते.

विशेषतः बालकामगारांचा प्रश्न हा आर्थिक कारणामुळे अधिक चिंताजनक बनला आहे. दारिद्रय व उपासमार यामुळे अनेक ग्रामीण कुटुंबात प्राथमिक शिक्षणाऐवजी रोजगाराला प्राधान्य द्यावे लागते. यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी सारे कुटुंब रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेत सामील होते. त्यांचे वय फुलण्याचे, अभ्यासाचे असते व ते उमलण्याअगोदरच कोमेजून जाते. बालश्रमिकांवर काही वेळा गरिबीमुळे तर काही वेळा वडिलोपार्जित व्यवसायात गुंतविले गेल्याने कामाची सक्ती केली जाते. उदा. जरीचे विणकाम, चटया विणने इत्यादीमुळे बालश्रमिक निर्माण होतात. ते गरिबीचे दुष्टचक्र, शिक्षणाचा अभाव देशातील मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या, इत्त्यादी कारणामुळे दारिद्रयरेषेखाली आहे. ही समस्या फक्त गरीब देशात नाही तर ती श्रीमंत राष्ट्रातही अस्तित्वात आहे. तसेच पालकांचे दारिद्रय, सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणा, निरक्षरता, शैक्षणिक प्रौढ मजुरांपेक्षा बालकामगार अतिशय स्वस्तात उपलब्ध होतात.

देशाची खरी संपत्ती ही आनंदी व निरोगी असली पाहिजे. याची देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यकता आहे. परंतू अतिरिक्त लोकसंख्यामुळे गरिबी व गरीबीमुळे बालमजूरी असे दुष्टचक्र सुरू झालेले आहे.

धोकादायक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बालश्रमिकांचे पुनर्वसन व या प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी भारत-अमेरिका यांनी एकत्र येऊन दि. 31 ऑगस्ट 2000 रोजी बालकामगार प्रथा निर्मुलनविषयी समान आर्थिक व तांत्रिक सहकार्य आणि सहभाग देण्याचे ठरवून एक करार केला. हा करार म्हणजेच (भारत-अमेरिका) बालकामगार प्रकल्प होय. त्याचे संक्षिप्त नाव (इंडस) प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी भारत सरकार व आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेवर सोपविण्यात आली असून अमेरिकेतील निधी व प्रत्यक्ष पद्धतीने सर्व अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेद्वारा उपलब्ध करून देण्यात येतो.

**बालकामगारांच्या संदर्भाती कायदे :**

2020 मध्ये भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहे. आपला देश विकसनशील असून शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक अशा महत्त्वाच्या क्षेत्रात केलेला विकास उल्लेखनीय आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने सन 1992 मध्ये



Scanned with OKEN Scanner

बालश्रमिक प्रथा निर्मुलनाविषयी जाहीरनामा प्रसिद्ध केला. ह्या जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करणारा भारत हा जगातील पहिला देश आहे.

**मोटार ट्रान्सपोर्ट अॅक्ट :**

1981 च्या कायद्याने मोटार वाहनांच्या अस्थापनेत लहान मुलांना कोणतेही काम करण्यास बंदी घातलेली आहे. बालकामगार नियंत्रण व निर्मुलन कायदा 1986 नुसार 14 वर्षाखालील मुलांना काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**सारांश :**

भारतात हा बालमजूराबाबत कायदे आहेत. नवीन कायद्याची आवश्यकता वाटत नाही. जे कायदे आहेत त्या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. तसेच बालमजूरीला खऱ्या अर्थाने प्रतिबंध करायचा असेल तर सामाजिक चळवळ होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये शासन, प्रशासकीय अधिकारी आणि त्यांच्यावरोबर समाजाचा सहभाग असणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर सामाजिक व आर्थिक परिस्थितीत अनुकूल बदल होऊ लागला. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या त्याच्या पाठीमागे एक भयंकर सामाजिक समस्या निर्माण झाली ती म्हणजे लोकसंख्या वाढ होय. लोकसंख्यावाढीमुळे बेकारीसारखी एक महाभयंकर समस्येचा जन्म झाला व या बेकारीमुळे प्रौढांना काम मिळेनासे झाले. परिणामतः काम न मिळाल्याने कुटुंबाच्या कुटुंब उपासमारीच्या चक्रात सापडली. उपासमारीची समस्या सोडविण्यासाठी देशात आज अनेक उपाय केले जात आहे.

## संदर्भ सूची :-

1. भारतातील बालमजुरांचा प्रश्न एक संकलन प्रायोजक : UNICEF युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड महाराष्ट्र राज्य कार्यालय.
2. बालमजुरी निर्मुलन प्रकल्प (बालहक्क कक्ष संशोधन व प्रलंबन विभाग यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे.
3. बालकल्याण शोध आणि बोध : अॅड. गोपाल सोनखेडे.
4. बालकल्याण दशा आणि दिशा : अॅड. गोपाल सोनखेडे.



Scanned with OKEN Scanner